# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com फोन क्रमांक – 07172-250659
क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/721 दिनांक :- 22 जुलै, 2020

**संदर्भ** :- या कार्यालयाचे संचारबंदी आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/697 दि.15.07.2020.

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भांकित या कार्यालयाकडील आदेशामधील अत्यावश्यक बाबी/सेवा मर्यादीत स्वरुपात व निर्बधासह सुरु राहतील यामधील परिच्छेद क्रं. 04 यामध्ये **" सर्व मेडिकल दुकाने सकाळी 09.00 ते सायंकाळी 07.00 या वेळेत सुरु राहतील तथापी ऑनलाईन औषध वितरण व सेवा व रुग्णालय संलग्न औषधांची दुकाने 24 तास सुरु राहील"** असे आदेशीत केलेले आहे. **त्यामध्ये आता पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-**

**आता चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व चंद्रपूर तालुक्यातील ऊर्जानगर आणि दुर्गापुर ग्राम पंचायत क्षेत्रातील औषधालय/मेडिकल दुकाने सकाळी 09.00 ते सायंकाळी 09.00 या वेळेत सुरु राहतील तसेच ऑनलाईन औषध वितरण व सेवा आणि रुग्णालय संलग्न औषधांची दुकाने 24 तास सुरु ठेवण्यास याव्दारे परवानगी देण्यात येत आहे.**

सदरचा आदेश चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व चंद्रपूर तालुक्यातील ऊर्जानगर आणि दुर्गापुर ग्राम पंचायत क्षेत्रात दि. 22/07/2020 ते दि. 26/07/2020 या कालावधीत लागु राहतील.

**सदरचा आदेश माझे सही व शिक्यानिशी दिनांक 22.07.2020 रोजी निर्गमीत करीत आहे.**

(डॉ. कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.**

1. मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
4. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
5. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
6. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
7. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
8. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
9. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर